भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.४०० / माहिती कक्ष / वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २१ / ०५ / २०१७

**१) संगनमत करुन विवाहीतेला पैश्यासाठी शारीरीक व मानसीक त्रास दिल्याने गुन्हा नोंद . :—**

अ) दिनांक ०७/०५/२०१६ ते ०८/०७/२०१७ चे. दरम्यान यातील सहाही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस तु आपले आईवडीलांचे घरुन तीन ते चार लाख रुपये का आणली नाही याकरणावरुन शारीरीक व मानसिक त्रास दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे. तुमसर येथे कलम ४९८(अ),३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गोंडाने पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

ब) दिनांक ३०/०४/२०१७ ते ०८.०० वा. दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीला सन २०१७ पासुन तु पागल आहेस, बिमार आहेस आपल्या माहेरुन १ लाख रु घेवुन असे फिर्यादीला बोलुन नेहमी शारीरीक व मानसीक त्रास देत असल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. कारधा येथे कलम ४९८,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. मेश्राम पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**२) क्षुल्लक कारणावरुन भांडण व शिवीगाळ करुन काठीने मारुन जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिली . :—**

दिनांक १९/०५/२०१७ चे ०९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी रामदास हेसाराम वहाणे वय ३० वर्ष, रा. कुंभली/धर्मापुरी हा आपले घरी हजर असतांनी आरोपी हा फिर्यादीचे घरासमोर येवुन 'तुझा भावु प्रदीप हा कुठे आहे' त्याला बाहेर बोलाव असे बोलुन शिवीगाळ देत असतांनी फिर्यादीने त्यास हटकले असता आरोपीने फिर्यादी सोबत भांडण करुन उजव्या पायाच्या अंगठयावर काठीने मारहाण करुन खाली पाडुन उजवे पायाचे मांडीजवळ चावा घेवुन जखमी करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोस्टे. साकोली येथे कलम ३२४,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) घराच्या मागील दाराची पाटी काढुन आत प्रवेश करुन लाकडी आलमारीतुन सोन्याचे साहित्याची चोरी . :—**

दिनांक २०/०५/२०१७ ते ०८.०० ते १९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी दयाराम पुंडलीक टिचकुले वय ४८ वर्ष, रा. सोमलवाडा यांचे घरी कोणीही हजर नसतांना त्याचे घराचे कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन मागील दाराची लाकडी पाटी काढुन आत प्रवेश करुन छपरात ठेवलेल्या लाकडी आलमारीतील प्लास्टीक डब्बी मधील १ सोन्याचा गोप वजन ९ ग्रॅम, १ सोन्याची पांचाली वजन ६ ग्रॅम असा एकुण ३०,०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. लाखनी येथे कलम ४५४,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावने पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

४) शेतातील बोअरींग मध्ये लावलेली सबमर्सीबल मोटार पंपची चोरी . :–

दिनांक १८/०५/२०१७ चे १९.०० ते १९.३० वा. दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे शेतात असलेल्या बोअरींग मध्ये लावलेली ३ एचपी ची टेक्सो कंपनीचे सबमर्सीबल मोटार पंप किंमती १५,०००/–रु. चोरुन नेल्याने फिर्यादी प्रमोद महादेव गिन्हेपुंजे वय ४५ वर्ष, रा. धारगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे. कारधा येथे कलम ३७९,३४ भांदवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गौर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

५) अल्पवीन मुलीस फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोदं . :–

दिनांक १९/०५/२०१७ चे १९.३० वा. दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष रा. मासळ ही घराजवळील बोरींगचा पाणी भरण्या करीता गेली असता ती घरी परत आली नाही म्हणुन बेपत्ता झाल्याने तिला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने पळवुन नेले असावे असे फिर्यादीचे तक्रारी वरुन मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश वरुन पोस्टे. लाखांदुर येथे कलम ३६३ भांदवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. उईके पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

६) सायकल दगडा वरुन गेल्याने खाली पडुन डोक्याला मार लागल्याने उपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु . :–

दिनांक २७/०४/२०१७ चे ०६.३० वा. दर. यातील मृतक सौ. ढेकलाबाई दयाराम वालदे वय ६० वर्ष, रा. डोडमाझारी ही मुलगा विजय दयाराम वालदे याचे सायकल दगडा वरुन गेल्याने मृतक ही खाली पडुन तिचे डोक्याला मागील बाजुस मार लागल्याने तिला औषधोपचारा करीता प्रथम नाकाडे हॉस्पीटल भंडारा येथे उपचार करुन रेफर झाल्याने तिला पुढील उपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो.स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. संतापे यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. गौर पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

७) अवैध देशी दारु अडयावर धाडी . :–

दिनांक २०/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. साकोली येथे अवैध देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हा दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ०१ लिटर ४४० मिली देशी दारु किंमती ४००/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस नियंत्रण कक्ष अधीकारी
भंडारा
दुरध्वनी.क्र ७५८८५६३३३५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.